f/sujay/circular

# मुंबई विद्यापीठ

क्र.संलग्नता/आयसीसी/(२०२४–२५)/०४/२०२४

## परिपत्रक:

विषयः– विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांनी महाविद्यालय विकास समिती (CDC) ची स्थापना व अहवाल सादर न केल्यामुळे नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत.....

संदर्भः– विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १) Aff./ICC/(2018-19)/04/ of 2018 दिनांक ०४ मे, २०१८,

२) स्मरणपत्र १–Aff./ICC/(2018-19)/47/ of 2019 दिनांक १६ मार्च, २०१९,

३) स्मरणपत्र २–Aff./ICC/(2019-20)/23/ of 2019 दिनांक ३० ऑक्टोबर, २०१९,

४) स्मरणपत्र ३–Aff./ICC/(2019-20)/34/ of 2020 दिनांक २८ फेब्रुवारी, २०२०,

५) स्मरणपत्र ४–Aff./ICC/(2020-21)/09/ of 2021 दिनांक ०६ मार्च, २०२१ आणि

६) स्मरणपत्र ५–Aff./ICC/(2021-22)/16/of.2021, दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ आणि

७) सुचना क्र संलग्नता/आयसीडी/२०२१–२२/२०८२, दिनांक ०३ मार्च २०२२.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना सदर परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ९७ नुसार महाविद्यालयाने महाविद्यालय विकास समिती (CDC) गठीत करणे व त्यासंबंधीत समितीचा वार्षिक अहवाल प्रत्येक वर्षी विद्यापीठाला ३० जून पूर्वी सादर करणे बंधनकारक आहे.

परंतु असे निदर्शनास येत आहे की, विद्यापीठाने उपरोक्त संदर्भानुसार वेळोवेळी परिपत्रके आणि स्मरणपत्रे निर्गमित करून ही महाविद्यालयांनी अद्यापही महाविद्यालय विकास समिती

....२/–

f/sujay/circular



गठीत केले नसल्याचे निदर्शनास आले आहे यासंदर्भात व्यवस्थापन परिषदेत पुढील प्रमाणे ठराव पारीत केला आहे.

> "ज्या महाविद्यालयांनी "महाविद्यालय विकास समिती" **College Development Committee** महाविद्याल गठीत केली नाही त्यांनी **College Development Committee** समितीची स्थापना करावी आणि तसा अहवाल दहा दिवसाच्या आत मुंबई विद्यापीठास पाठवावा. ज्या महाविद्यालयांनी **College Development Committee** ची स्थापना अगोदरच केली आहे त्यांनी मागील एक वर्षाचा अहवाल पुढील दहा दिवसात विद्यापीठास पाठवावा. जे महाविद्यालय वरील दोन्ही पैंकी काहीही करणार नाहीत. अशा महाविद्यालयांवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल व अशा महविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून प्रथम वर्षाचे विद्यार्थी प्रवेश देण्यात बंदी करण्यात यावी."

उपरोक्त ठरावाचे महत्व व गांर्भीय लक्षात घेता "महाविद्यालय विकास समिती" गठित करणे व वार्षिक अहवाल दहा दिवसात विद्यापीठात सादर करावे, अन्यथा **जे महाविद्यालय अहवाल सादर करणार नाहीत अशा महविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून प्रथम वर्षाचे विद्यार्थी प्रवेश देण्यात बंदी करण्यात येईल**, याची नोंद घ्यावी.

Balirarm

मुंबई–४०० ०३२ (प्रा. बळीराम गायकवाड)
१८ मे, २०२४ प्रभारी कुलसचिव

प्रत:–

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना.